


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १५४ वा शनिवार दि. २६ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# फडणवीस-शहांची २० मिनिटं बैठक, कोणाकोणाचे पत्ते कट? भाजपमधील ३ नावं विशेष चर्चेत...

वृत्तसंस्था/मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची नवी दिल्लीत भेट घेतली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी महायुती सरकारमध्ये महत्त्वाचे बदल होण्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील सरकार स्थापन होऊन ६ महिने उलटले आहेत. या कालावधीत वादग्रस्त ठरलेल्या, आरोप झालेल्या मंत्री आणि आमदारांची संख्या मोठी आहे. यातील सर्वाधिक मंत्री शिवसेनेचे आहेत. मुख्यमंत्री फडणवीस आणि अमित शहा यांच्यात २० मिनिटं चर्चा झाली. फडणवीस भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ऊर्जा मंत्री मनोहर खट्टर यांनादेखील भेटले. शहा आणि फडणवीस यांच्या भेटीत महायुती सरकारमधील मंत्र्यांच्या गेल्या ६ महिन्यांमधील कामगिरीवर चर्चा झाल्याची सुत्रांची माहिती आहे. अकार्यक्षम आणि वादग्रस्त मंत्र्यांना नारळ दिला जाण्याची दाट शक्यता आहे. काही मंत्र्यांचे विभाग भ्रष्टाचारामुळे चर्चेत आहेत. त्या मंत्र्यांनादेखील बाहेरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो, अशी माहिती सुत्रांनी दिली.

महायुती सरकारमधील अनेक मंत्र्यांची गच्छंती होण्याची दाट शक्यता आहे. शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट, राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांची हकालपट्टी निश्चित मानली जात आहे. शिरसाट यांचा बेडरुममधील व्हिडीओ समोर आला. त्यात त्यांच्याजवळ पैशांनी भरलेली बॅग दिसत होती. त्यांच्या मुलाला हॉटेल खरेदी करता यावं यासाठी पात्रतेच्या अटी बदलण्यात आल्याचे आरोप झाले. शिरसाट यांना प्राप्तिककर विभागाची नोटिसही आलेली नाही. तर दुसरीकडे मंत्री कोकाटे विधान परिषदेत मोबाईलवर रम्मी खेळत असल्यानं अडचणीत आले. त्यांची अनेक विधानं वादग्रस्त ठरलेली आहेत. संजय शिरसाट, माणिकराव कोकाटे यांच्यासह शिवसेनेचे मंत्री संजय राठोड, भरत गोगावले, योगेश कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवळ, भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांनाही मंत्रिपदावरुन दूर केलं जाऊ शकतं. महाजन हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अतिशय जवळचे म्हणून ओळखले जातात. ते उत्तर महाराष्ट्रातील भाजपचे प्रमुख नेते आहेत. राहुल नार्वेकर यांना मंत्री होण्याची इच्छा आहे.



त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकतं. त्यांच्या जागी भाजपचे वरिष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी लागू शकते. याबद्दल नार्वे कर यांना विचारलं असता, विधानसभेचा अध्यक्ष म्हणून मी समाधानकारक काम केलेलं आहे. पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारण्यास मी तयार आहे, असं उत्तर त्यांनी दिलं

# मृत्यूच्या दाढेतून चौघांची सुखरूप सुटका!

जनसंचलन/मेहकर

पाऊस दमदार बरसल्याने मेहेकर तालुक्यातील अंजनी खूर्दच्या नाल्याला काच नदीमुळे पूर आल्याने नाल्यातील पाण्याचा प्रवाह वेगाने होत आहे. या नाल्यात ४ शेतकरी अडकून त्यांचा पाण्यातून बाहेर पडण्यासाठी जीवघेणा संघर्ष सुरू असतांना त्यांना ग्रामस्थांनी जणू मृत्यूच्या जबड्यातूनच बाहेर काढले आहे. हा प्रसंग काळजाचा ठोका चुकवणारा होता. बुलढाणा जिल्ह्यात कमी अधिक पावसाचा जोर आहे. मेहकर तालुक्यातील अंजनी खुर्द येथील काच नदीला पावसामुळे अचानक पूर आल्याने नदीतील पाण्याचा प्रवाह वेगाने प्रवाहित होत असतांना, नाल्यात ४ शेतकऱ्यांना ग्रामस्थांनी



प्रसंगावधान राखून जीवनदान दिले आहे. रामेश्वर ढोले, अनिता ढोले, छायाबाई पायघन, आणि नम्रता पायघन अशी या वाचवलेल्या व्यक्तींची नावे आहेत. सदर शेतकरी शेतातली कामे आटोपून ते ट्रॅक्टरने घराकडे परतत होते. गावाकडे जाण्याचा रस्ता नाल्यातून असल्याने त्यांनी ट्रॅक्टर ओसंडून वाहणाऱ्या नाल्यातील रस्त्यावर चालवून नेला.मात्र पाण्याच्या प्रवाहाला अत्यंत गती असल्याने ट्रॅक्टर कडेलाच पाण्यात उलटण्याच्या स्थितीत होऊन चारही शेतकरी पुराच्या पाण्यात अडकले होते. यापैकी एका व्यक्तीने प्रसंगावधान दाखवत तातडीने गावात फोन करून मदतीची याचना केली.या घटनेची माहिती मिळताच गावातील काही लोक तात्काळ धावून आले व मृत्यूच्या दारातून चौघांची सोडवणूक करण्यात आल्याने ग्रामस्थांच्या धाडसी मदतीची आहे.

# अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत!

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे संत गजाननाला साकडे!

जनसंचलन/ शेगाव

देवाजवळ सुख दुःखातून सोडवणूक करावी, असे साकडे घातले जाते. मात्र आज राज्यमंत्रीबाबासाहेब पाटील यांनी राष्ट्रवादीचे अजित पवार यांना मुख्यमंत्री होऊ द्यावे,असे श्री संत गजानन महाराजांना साकडे घातले आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर असताना त्यांनी शेगाव येथे श्री संत गजानन महाराज यांच्या मंदिरात समाधीचे दर्शन घेतले.दरम्यान अजित पवार हे नव्या काळामध्ये मुख्यमंत्री व्हावेत असे साकडे त्यांनी संत गजानना चरणी घातले आहे. आगामी निवडणुका महायुती मधूनच लढवणार, मात्र काही ठिकाणी परिस्थिती पाहून निर्णय घेऊ,



सरकार मधील ८ मंत्र्यांना डच्चू मिळणार असा दावा सामना वृत्तपत्रातून करण्यात आला, त्याचा निर्णय वरिष्ठ घेतील, त्यावर मला बोलण्याचा अधिकार नाही,असेही ना. पाटील म्हणाले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अवैध सावकारांवर कठोर कारवाई करणार असल्याचीही त्यांनी यावेळी सांगितले.

# प्रगतीची सोनपावले

## संपादकीय लेख



महाराष्ट्राची अर्थव्यवस्था येत्या पाच वर्षांत एक लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठेल, या ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ्च्या ताज्या अहवालात व्यक्त झालेल्या आशावादातून महाराष्ट्राचे देशातील आघाडीचे स्थान पुन्हा अधोरेखित झाले आहे. सत्ताधारी-विरोधकांच्या याबाबतच्या दाव्या-प्रतिदाव्यांपेक्षा अशा आंतरराष्ट्रीय संस्थेचा निष्कर्ष अधिक विश्वासार्ह व महत्त्वाचा ठरतो. सध्याचे राज्यांतर्गत उत्पादन (जीडीपी) ५३६ अब्ज डॉलर, म्हणजे सिंगापूरच्या बरोबरीने असल्याची बाबही राज्यातील नागरिकांना सुखावणारीच आहे. ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ्ने विविध क्षेत्रांमधील राज्याच्या प्रगतीचे तपशीलवार चित्र या अहवालात मांडले आहे. त्यामध्ये या प्रगतीमागील कारणे, प्रगती होत असलेल्या क्षेत्रांसह काही आव्हानांचीही चर्चा केल्याचे दिसते. त्यानुसार पावले टाकून सन २०३०पर्यंत सध्याच्या दुपटीने प्रगती करण्याचे आव्हानही या निमित्ताने अधोरेखित झाले आहे वाहनांची निर्मिती आणि सुट्या भागांचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात होत असून, देशातील या उत्पादनातील राज्याचा वाटा वीस टक्के आहे. त्याबरोबरच औषधे आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती १६-१७ टक्के, कापडाचे उत्पादन ८-१२ टक्के इतके आहे. गुजरातपाठोपाठ महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार राज्य ठरले आहे. देशातील १५.४ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, त्याचा देशाच्या ङ्गजीडीपीफ्त १३.७ टक्के इतका वाटा आहे. त्यामध्ये दागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रसायने, औषधे आणि यंत्रसामग्रीचा समावेश होतो. परकीय गुंतवणुकीतही राज्य आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९.६ अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली आहे. विशेषत: आर्थिक व तंत्रज्ञानातील प्रगतीला गती देणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील अठराशे ङ्गग्लोबल केपॅबिलिटी सेंटरफ्पैकी सर्वाधिक (७३०) सेंटर, ही स्पर्धात्मक युगात महाराष्ट्रासाठी विशेष अभिमानाची बाब ठरावी. या अहवालाने गुंतवणुकीसह महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण, निर्यात, आर्थिक शिस्त, साक्षरतेचे प्रमाण आणि स्थिर नेतृत्वाला या प्रगतीचे श्रेय दिले आहे. ङ्गजीडीपीफ्च्या तुलनेत कर्जांचे प्रमाण इतरांच्या तुलनेत कमी, सेवा क्षेत्राचे मोठे योगदान; तसेच धातू, वाहन, अन्नप्रक्रिया, पेट्रोलियम आणि यंत्रसामग्री या क्षेत्रांतील वाटचाल या विकासात महत्त्वपूर्ण ठरली आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील औद्योगिक क्षेत्राचे योगदान घटले असून सेवा क्षेत्राचे योगदान वाढत असल्याची नोंद पुढील दिशा दाखवते. आर्थिक प्रगतीमध्ये प्रामुख्याने गुजरात, तमिळनाडू आणि तेलंगण आदी राज्यांशी महाराष्ट्राची स्पर्धा आहे. त्यामुळेच एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेच्या मार्गातील आव्हाने ओळखून उपायांची पावले टाकण्याची हीच वेळ आहे. सरकार पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करीत असून त्यातून वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळ, नुकताच पूर्ण झालेल्या समृद्धी महामार्गासह नियोजित नागपूर-गोवा द्रुतगती महामार्गासारख्या सुविधा उभ्या राहत आहेत; मात्र अनेक कारणांमुळे अशा प्रकल्पांना होणारा विलंब टाळून त्यांना अधिक गती देणे आवश्यक आहे. भौगोलिक असंतुलन दूर करून मुंबई-ठाणे-पुणे व नाशिकच्या पलीकडे या विकासाची पावले वळली पाहिजेत. काहीशा मागे पडत असलेल्या उत्पादन क्षेत्राला गती देण्यासाठी नव्या उद्योगांच्या स्थापनेतील लालफीतशाही, भ्रष्टाचार अशा राजकीय-प्रशासकीय त्रुटी दुरुस्त करण्याची गरज आहे. त्यांच्यासाठी रस्ते, स्वस्त आणि अखंडित वीजपुरवठा, वित्तपुरवठा, ऊर्जा व पर्यावरण सुरक्षा यांकडेही विशेष लक्ष पुरवावे लागेल. याच ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ्च्या एका अहवालानुसार महाराष्ट्रात सुमारे सव्वापाच टक्के इतके बेरोजगारीचे प्रमाण असून, शहरी भाग आणि सुशिक्षितांमध्ये ते अधिक आढळते. हे चित्र बदलण्यासाठी रोजगारक्षम क्षेत्रांमधील आवश्यक कौशल्य प्रशिक्षणावर भर द्यावा लागेल. हे लक्ष्य गाठतानाच स्थलांतर, शहरांमध्ये होणारे केंद्रीकरण, बकालीकरण, सुविधांवर येणारा ताण, हवामान व आरोग्यसंकटे, उत्पन्नातील विषमता या आनुषंगिक आव्हानांचाही सामना करावा लागणार आहे. या वाटचालीची गती कायम ठेवण्यासाठी धोरणसातत्य, ही सर्वांत महत्त्वाची बाब ठरणार आहे; तसेच सध्याचे पराकोटीचे कडवट वातावरण पाहता राजकीय- सामाजिक सलोखा आणि शांतता-सुव्यवस्था, ही प्रगतीची गुरुकिल्ली आहे, हेदेखील विसरून चालणार नाही.

# सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचा जिल्हा दौरा

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील हे शुक्रवार व शनिवार दि. २५ व २६ जुलै २०२५ रोजी शेगाव व खामगाव जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. २५ जुलै रोजी रात्री ९.१५ आनंद विसावा, शेगाव जि.बुलढाणा येथे आगमन व राखीव. शनिवार दि.२६ जुलै २०२५ रोजी सकाळी ७ वाजता श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन. सकाळी ७.३० वाजता आनंद विहार येथे कार्यकर्त्यांशी भेट. सकाळी ९.३० वाजता खामगावकडे प्रयाण, सकाळी १० वाजता ब्रिटिश कालीन विश्रामगृह, खामगाव येथे सहकार विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत आढावा बैठक. सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. सकाळी ११.४५ वाजता शहर पोलीस स्टेशन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी १२ वाजता टॉवर चौक येथे महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन, दुपारी १२.१५ वाजता सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट व राखीव. दुपारी १.१५ वाजता एकबोटे चौक, अग्रसेन चौक येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जनसंपर्क कार्यालयास भेट. दुपारी १.३० वाजता शिवाजी महाराज स्टेडीअम समोर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी १.४० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुड पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन. दुपारी १.५० वाजता केशवराव कापले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २ वाजता मस्तान चौक येथील मस्तानशाह बाबा दर्गा येथे चादर चढविणे, दुपारी २.१५ वाजता मोहन चौक येथे देवेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २.३० वाजता सुटाळा येथे छत्रपती संभाजी महाराज व संताजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी २.४५ वाजता घाटपुरीनाका येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन, दुपारी ३




वाजता घाटपुरी ग्रामपंचायत समोर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन. दुपारी ३.१५ वाजता जळका भडंग गाव येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी ४ वाजता भारत लॉन येथे शेतकरी मेळावा व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता पिंपळगाव राजा येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन, सायंकाळी ७.३० वाजता राखीव व रात्री ८ वाजता नांदुरा रेल्वेस्टेशनकडे प्रयाण व आगमन. रात्री ९.४५ वाजता नांदुरा रेल्वे स्थानकावरुन मुंबईकडे प्रयाण करतील.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना शेतकऱ्यांनो, ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० व्या हप्त्याचा लाभ लवकरच वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार ९९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ४३३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषि उपसंचालक अनुराधा गांवडे यांनी केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-




केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# १४ हजारहून अधिक पुरुषांनी घेतला लाडकी बहीण योजनेचा लाभ, पुरुषांनी पैसे कसे मिळवले? शोध सुरु

**मुंबई :** जवळपास वर्षभरापूर्वी लाडकी बहीण योजना सुरू झाली होती. पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये दिले जाणाऱ्या या लाडकी बहीण योजनेचा लाभ अनेक अपात्र महिलांनाही घेतला. गरजू महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा लाभ सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनाही घेतला आणि एकामागे एक अनेक अपात्र महिलांना योजनेतून काढून टाकण्यात आलं. पण आता केवळ महिलाच नाही, तर लाडकी बहीण योजनेचा लाभ अनेक पुरुषांनीही घेतल्याचं समोर आलं आहे. योजनेत हा मोठा घोटाळा समोर आला आहे.लाडकी बहीण या योजनेचा लाभ तब्बल १४,२९८ पुरुषांनी घेतला. त्यांना




२१.४४ कोटी रुपये वाटण्यात आले. ऑगस्ट २०२४ पासून ही योजना सुरु झाली. योजनेत लाभार्थ्यांची छाननी करताना हा प्रकार उघडकीस आला. सार्वजनिक वितरण प्रणालीतील डेटा तपासल्यावर आणखी धक्कादायक गोष्टी समोर आल्या. २ लाख ३६ हजार १४ लाभार्थ्यांच्या नावांमध्ये संशय आहे. ते पुरुष असून त्यांनी महिलांच्या नावाने लाभ घेतला असावा, असा संशय आहे. ज्या १४,२९८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला, त्यांना दरमहा मिळणारं १५०० रुपये मानधन आता बंद करण्यात आलं आहे. योजनेत झालेल्या घोटाळ्यामुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. महिलांच्या योजनेतून पुरुषांनी अर्ज करुन पैसे कसे मिळवले, हे शोधण्यासाठी आता कागदपत्रांची छाननी सुरू आहे.

तसंच, नियमानुसार ६५ वर्षांवरील व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळत नाही. तरीही, २ लाख ८७ हजार ८०३ वयोवृद्ध महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. या महिलांना ४३१ कोटी ७० लाख रुपये मिळाले. एका कुटुंबातील दोनपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. असं असतानाही, ७ लाख ९७ हजार ७५१ कुटुंबांतील दोनपेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यांना १,१९६ कोटी ६२ लाख रुपये मिळाले असल्याचं समोर आलं आहे.६५ वर्षांवरील महिलांना या योजनेतून वगळलं जाईल. त्यामुळे सरकारचे वर्षाला ५१८ कोटी रुपये वाचणार आहेत. दुसरीकडे ज्या कुटुंबातील दोनपेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांना योजनेतून काढण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.लाडकी बहीण योजना ही माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने सुरु केली होती. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिक मदत करणं हा होता. यासाठी सरकारला वर्षाकाठी ४२ हजार कोटी रुपये खर्च येतो. विधानसभा निवडणुकीत महायुतीला या योजनेचा फायदा झाला, मात्र, या योजनेमुळे राज्याच्या विकासकामांना फटका बसला आहे.

## सासरा सतत काम सांगतो, नव्या सुनबाईना आवडेना

# रागाच्या भरात जेवणात विष टाकलं अन् दोघे... रत्नागिरी हादरलं

**देवरुख:** रत्नागिरी जिल्ह्यात देवरुख तालुक्यात संतापजनक आणि आश्चर्यकारक घटना घडली आहे. सासरे घरी काम सांगतात, केर काढण्यास सांगतात, स्वच्छता करण्यास सांगतात म्हणून चिडलेल्या सुनबाईंनी एक मोठा प्लॅन केला. मात्र, हा प्लॅन फिस्कटल्याने आता या सूनबाईंना देवरूख पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. घरातील काम सांगतात यामुळे चिडलेल्या सुनबाईंनी सासऱ्याला संपवण्यासाठी विषप्रयोग केला. त्यांनी अन्नातून सासऱ्याला विष दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आहे. दरम्यान, आता याप्रकरणी सासरा आणि पती या दोघांवरही रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालय उपचार सुरु असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती देवरुख पोलीस ठाण्याचे सूत्रांनी दिली आहे.याप्रकरणी देवरूख पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संगमेश्वर तालुक्यात कोसुंब रेवाळेवाडी परिसरात राहणाऱ्या कुटुंबात ही धक्कादायक घटना घडली आहे. सासऱ्यासह पतीलाही या विषयप्रयोगाचा फटका बसला आहे. चिडलेल्या सुनबाईने सासरा काम सांगतो त्याचा राग मनात धरून एक मोठा प्लॅन केला. चक्क त्यांच्या जेवणामध्येच विषप्रयोग करण्यात आला.याप्रकरणी सचिन जगन्नाथ सोलकर (वय ३४ वर्षे) यांनी देवरुख पोलीस ठाण्यात फीर्याद दिली आहे. स्वप्नाली सचिन सोलकर (वय ३२ वर्षे) असं संशयित महिला आरोपी असलेल्या सुनबाईचे नाव आहे. या प्रकारे गौरव पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल करून या महिलेला अटक केली असून तिची चौकशी सुरू आहे.

सचिन सोलकर व स्वप्नाली सोलकर यांचा १३ एप्रिल २०२५ रोजी विवाह झाला. या सुनबाईनी ज्यांच्यावर विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला ते सासरे जगन्नाथ सोलकर हे घरातील कचरा काढणे, साफसफाई करणे व घरातील काम करण्यास सांगतात. याच रागातून हा प्लॅन आखला गेला. स्वप्नाली हिने त्यांना जीवे ठार मारण्यासाठी चक्क जेवणामध्ये विषारी द्रव्याची मात्रा मिसळली, अशी माहिती तिचा पती सचिन



सोलकर याने देवरुख पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत दिले आहे. हे जेवण सासरे जगन्नाथ व सचिन या दोघांनीही खाल्ले व या दोघांनाही जेवणानंतर अचानक अस्वस्थ वाटू लागलं ही धक्कादायक घटना २२ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास घडली.या दोघांनाही तातडीने देवरुख ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं. पुढील उपचारासाठी त्यांना तातडीने रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या दोघांवरही सध्या उपचार सुरू आहेत. याचवेळी त्यांना जेवणातून विषबाधा झाल्याने हा त्रास झाल्याची प्राथमिक माहिती वैद्यकीय अहवालात समोर आली. त्यानंतर देवरुख पोलिसांनी तातडीने संशयित महिला आरोपी सुनबाई स्वप्नाली सोलकर हीच्यावर देवरुख पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करून पोलीसांनी ताब्यात घेऊन तिला अटक केली आहे.

या सगळ्या प्रकरणाची गंभीर दखल जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी घेतली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश माईनकर यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

देवरुख पोलीस निरीक्षक उदय झावरे, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत मसुरकर, हे. कॉ. सचिन पवार, हे. कॉ. सचिन कामेरकर, सहाय्यक पोलीस फौजदार श्रीकांत जाधव, महिला पोलीस कॉन्स्टेबल मंजुश्री पाडावे या पोलिसा पथकाने या सगळ्या घटनेचा पंचनामा केला आहे. पोलीस अधीक्षक नितीन बगाटे, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक बाबुराव महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली देवरुख पोलीस अधिक तपास करत आहेत.

# कर्जतमध्ये भटक्या कुत्र्यांचं थैमान, दोन गावांमधील चिमुरड्यांवर हल्ला, श्वानदंशाने कोवळे चेहरे कोमेजले

**रायगड :** भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासाने राज्यभरातील नागरिक संतापलेले पाहायला मिळतात. पहाटे किंवा रात्री-अपरात्री एकट्या दुकट्याने जाणाऱ्या नागरिकांवर कुत्र्यांचे हल्ले सर्वश्रुत आहेत. दुचाकीच्या मागे धावत भुंकणाऱ्या कुत्र्यांमुळे काही अपघात घडल्याचेही समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात भटक्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे दोन चिमुकल्या जखमी झाल्याचा दुर्दैवी प्रकार समोर आला आहे.रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात दहिवली तर्फे वरेडी तसेच कोदिवले गावामध्ये भटक्या कुत्र्यांनी चावा घेत लहान मुली तसेच वृद्ध नागरिकांना जखमी केले आहे.



दोन महिन्यांपासून कोदिवले तसेच दहिवली गावामध्ये कुत्र्यांनी थैमान घातलं आहे.या भटक्या कुत्र्यांपासून सुटका व्हावी यासाठी ९ आणि १६ जून २०२५ रोजी दहिवली ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये अर्ज देण्यात आले होते. त्या अर्जाची दखल घेत त्यांनी पशुवैद्यकीय अधिकारी यांना तात्काळ कळवण्यात आले होते. परंतु पशुवैद्यकीय अधिकारी यांनी या भटक्या कुत्र्यांचा कोणत्याही प्रकारे बंदोबस्त केला नाही. त्याचे परिणाम कोदिवले गावातील दोन मुलींना भोगावे लागत आहेत. सिद्धी शेखर तरे हिच्या हाताला कुत्र्याने चावा घेतल्याने खूप मोठी जखम झाली आहे. तसेच दहिवली गावातील लहान मुलीचा भटक्या कुत्र्यांनी चावा घेतला असून जखमी केले आहेत. मानसी गोविंद भोईर या मुलीच्या डोक्याला चावा घेतला असून डोक्यातून रक्तस्राव होत आहे. तसेच मालेगाव येथील खंडू भोईर यांनाही कुत्र्याने चावले आहे.पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी वेळीच भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त केला असता, तर ही वेळ आलीच नसती, अशा शब्दात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर ग्रामस्थांकडून टीकेची झोड उठवली जात आहे.

गेल्याच आठवड्यात मुंबईतील मानखुर्द भागात एका रिक्षामध्ये चिमुरड्यावर पिटबुल जातीच्या कुत्र्याने हल्ला केल्याचा भीषण प्रकार समोर आला होता. श्वान मालकाने घाबरलेल्या चिमुरड्याजवळ हलगर्जीपणे कुत्र्याला बसवल्याने ही घटना घडल्याचे व्हिडिओमध्ये पाहायला मिळत होते.दरम्यान, २०२३ मध्ये भारतात कुत्र्यांच्या चाव्याच्या सर्वाधिक घटना महाराष्ट्रात घडल्याची माहिती आहे. ४.३५ लाखांहून अधिक घटना घडल्या असून २०२२ च्या तुलनेत ही संख्या ११.३२ टक्क्यांनी अधिक आहे. राज्यात कुत्र्यांच्या चाव्याच्या दररोजच्या सरासरी ११९२ घटना २०२३ मध्ये घडल्या होत्या

# आरजे महवशसोबत चहलच्या अफेअरच्या चर्चा

## ऋषभ पंतने दिली हिंट; म्हणाला, त्याचा साखरपुडा झालाय

**मुंबई** - युजवेंद्र चहल चा अभिनेत्री धनश्री वर्माशी घटस्फोट होऊन बरेच महिने झाले आहेत. आता चहलच्या आरजे महवशसोबतच्या लग्नाच्या अफवांना हवा मिळाली आहे. जेव्हा युजवेंद्र चहल द ग्रेट इंडियन कपिल शो मध्ये पाहुणा म्हणून आला होता तेव्हा ऋषभ पंतने त्यांच्या साखरपुड्याबद्दल भाष्य केलं. अर्चना पूरण सिंगने व्लॉगमध्ये क्रिकेटपटूंसोबतच्या बीटीएसची झलक दाखवली. व्लॉगच्या सुरुवातीला अर्चना गंमतीने तिच्या घशात दुखण्याचा उल्लेख करते आणि म्हणते, आज मी कॅमेऱ्यासमोर कसं हसू? ती सेटच्या मागे कपिल शर्माला भेटते आणि त्याच्या सूटचं कौतुक करते आणि म्हणते, तुला हा सूट कुठून मिळाला? खूप छान दिसतोय.पुढे क्रिकेटपटू नवजोत सिंग सिद्धूला भेटले. सिद्धूने अभिमानानं अभिषेक शर्माला भारतीय क्रिकेटचा भविष्यातील चेहरा म्हटलं. अर्चनाने उत्साहाने नवीन खेळाडूचं स्वागत केलं आणि त्याला सुंदर मुलगा म्हटलं. त्यानंतर ऋषभ पंत म्हणाला



की, अपघातानंतर त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. त्यानंतर ऋषभ पंतने त्याच्या यूट्यूब चॅनेलचा उल्लेख केला आणि तो एक कंटेंट क्रिएटर देखील झाला आहे असं सांगितलं. ऋषभ पंतने युजवेंद्र चहलच्या अंगठीकडे इशारा केला. त्यानंतर अर्चनाने मस्करीने म्हटलं, तू तिच्याशी साखरपुडा केला आहे का? यावर ऋषभ पंतने युजवेंद्रकडे इशारा करत म्हटलं, त्याचा आधीच साखरपुडा झाला आहे. त्यानंतर युजवेंद्र धनश्रीबद्दल बोलताना म्हणाला, ते लग्न आता संपला आहे.अर्चनाने चहलला थांबवलं नाही. तिनं क्रिकेटपटूला तिच्या मड आयलंडच्या घरी आमंत्रित केलं, कारण त्याला मुंबईत येण्यासाठी वेळ मिळत नाही. ऋषभने लगेच उत्तर दिलं, तो नेहमीच इथेच राहतो. उत्तर ऐकताच युजवेंद्र सावध होतो आणि म्हणतो, तू सर्वांना सांगतोस का? ऋषभ पंतच्या या वक्तव्यामुळे चहल आणि आरजे महावशच्या अफेअरच्या चर्चांना वेग आला आहे. दरम्यान, चहलच्या वाढदिवसादिवशी आरजे महवशसुद्धा त्याच्यासोबत होती. तिनं क्रिकेटपटूला घट्ट मिठी मारलेली. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालाय.

# एचएसआरपी नंबरप्लेटचे नखरेच अधिक, अपॉइंटमेंट घेऊनही मनस्ताप; ती गोष्ट घडल्यास पोलीस ठाण्यात तक्रार बंधनकारक...

**नाशिक :** वाहनांवर हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवा असा तगादा प्रादेशिक परिवहन विभागाकडून लावला जात असला तरी नोंदणी करूनही संबंधित केंद्रांवर निर्धारित वेळेत नंबरप्लेट बसेलच याची शाश्वती नाही. ङ्मअपॉइंटमेंटफ घेऊनही त्यावेळी केंद्रावर नंबरप्लेट उपलब्ध नसल्याचा अनुभव वाहनधारकांना येत असून त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.वाहन सुरक्षेच्या दृष्टिने २०१९ पूर्वीच्या वाहनांवर ङ्मएचएसआरपीफ नंबरप्लेट बसविणे सरकारने अनिवार्य केले. बनावट नंबरप्लेट्सच्या आधारे होणारे गुन्हे रोखण्यासाठी नंबरप्लेट उपयुक्त ठरतील. रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविणेही शक्य होईल. नंबरप्लेट्स लवकर बसवून घ्या, अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा प्रादेशिक परिवहन विभागातर्फे देण्यात येत आहे.नंबरप्लेटसाठी पूर्वी ३० जूनपर्यंत मुदत होती. ती वाढवून १५ ऑगस्ट करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारक संकेतस्थळावर नोंदणी करून घेत आहेत. संबंधित संकेतस्थळावर दिवस, वेळ आणि केंद्र निश्चित करून वाहनधारक तेथे पोहोचतात. परंतु, नंबरप्लेट तयार नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे काही वेळ थांबणे किंवा नंतर जाणे असे दोनच पर्याय त्यांच्यापुढे राहतात. निर्धारित वेळेत नंबरप्लेट उपलब्ध होणार नसेल, तर अपॉइंटमेंटचा काय उपयोग, असा सवाल उपस्थित होत आहे.एचएसआरपीफ नंबरप्लेट तुटली, हरवली किंवा या नंबरप्लेटचे काही नुकसान झाले तर संबंधित वाहनधारकाला नवीन नंबरप्लेट बसविण्याकरिता पोलिस ठाण्यात तक्रार करणे अनिवार्य आहे. तक्रारीचा हा पुरावा नवीन नंबरप्लेट बसविण्याकरिता सादर करावा लागतो. नव्याने नंबरप्लेट बसविण्यासाठी पुन्हा अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्जप्रक्रिया पूर्ण करावी लागते. वाहनाची सर्व माहिती पुरविल्यानंतर ङ्मरिप्लेसमेंटफ हा पर्याय निवडून व निर्धारित शुल्क भरून पुन्हा अपॉइंटमेंट घ्यावी लागते.वाहनधारकाने ज्या दिवसाची अपॉइंटमेंट घेतली असेल त्या दिवशीच बहुतांश नंबरप्लेट बसविल्या जातात. परंतु नंबरप्लेट केंद्रांवर एक-दोन दिवस उशिरा प्राप्त होण्याचे प्रकारही घडतात. त्यानुसार बोलावले जाते.

# सोनालीसोबत अमृता सुभाषचाही जबरदस्त डान्स, या सिनेमातल्या गाण्याच दिसला वेगळाच अंदाज...



**मुंबईः** परिणती - बदल स्वतःसाठी या सिनेमाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती, काही दिवसांपूर्वी सिनेमाचा ट्रेलरही समोर आला होता. आता या सिनेमातं एक गाण समोर आलं आहे. अमृता सुभाष आणि सोनाली कुलकर्णी यांच्या या सिनेमात भूमिका आहेत.दोन सशक्त आणि आत्मनिर्भर स्त्रियांच्या आयुष्याचा आणि त्यांच्या मैत्रीचा भावनिक प्रवास मांडणाऱ्या ङ्गपरिणती - बदल स्वतः साठीफ या चित्रपटातील पहिलं गाणं ङ्गराणीफ नुकतंच रसिकांच्या भेटीला आलं असून, ते प्रेक्षकांच्या मनाला भिडताना दिसतंय. हे गाणं केवळ मैत्रीचं नसून स्त्रियांच्या स्वशोधाचा सुरेल आविष्कार आहे. सोनाली कुलकर्णी आणि अमृता सुभाष यांच्या जबरदस्त अभिनयामुळं आणि सशक्त स्क्रीन प्रेझेन्समुळं या गाण्याला एक वेगळीच ऊर्जा लाभली आहे.संगीतकार समीर साप्तीस्कर यांनी दिलेल्या जबरदस्त चालीवर समीर सामंत यांचे अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी बोल सजले आहेत. वैशाली माडे आणि प्राजक्ता शुक्रे यांच्या दमदार गायकीने हे गाणं अजूनच उठावदार झालं आहे. ङ्गराणीफ हे गाणं एक पेपी ट्रॅक असलं तरी त्यामागं स्वतः साठी जगण्याची आणि स्वत्व टिकवण्याची प्रेरणा देणारा एक सखोल भावनिक थर आहे.या गाण्याबद्दल लेखक व दिग्दर्शक अक्षय बाळसराफ म्हणतात, ङ्गराणीफ हे गाणं म्हणजे दोन स्त्रियांच्या नात्याचं आणि त्यांच्या आत्मशक्तीच्या जागृतीचं प्रतीक आहे. एका सुंदर प्रवासाची सुरुवात आहे, ज्यात स्त्रिया स्वतःसाठी उभ्या राहतात, स्वतःचं अस्तित्व शोधतात आणि त्याचा अभिमान बाळगतात. आम्ही हे गाणं केवळ ऐकावं असं नाही, तर अनुभवावं अशी रचना केली आहे. कारण ही प्रत्येक स्त्रीच्या अंतःकरणातून उमटणारी ओळख आहे.फ्फ्विशेष म्हणजे सोनालीनं अनेक चित्रपटांमध्ये यापूर्वी डान्स केल्याचं दिसून आलंय, पण अमृतानं देखील या सिनेमात डान्स केल्याचं पाहायला मिळतंय, हे चाहत्यांसाठी सरप्राइज ठरणार आहे.पीएच फिल्म्स, फिनिक्स फिल्म्स आणि इनसिंक मोशन पिक्चर्स यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित या चित्रपटाचे निर्माते पराग मेहता आणि हर्ष नरूला असून, अमित डोगरा, मोना नरूला, आशिष त्रिवेदी, शारदा नरूला, मनोज जैन, मोहित लालवानी, कांचन शाह आणि शांता जैन हे सहनिर्माते म्हणून सहभागी आहेत. अक्षय बाळसराफ यांनी लेखन व दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटात अमृता सुभाष, सोनाली कुलकर्णी आणि अक्षर कोठारी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणारा ङ्गपरिणती बदल स्वतःसाठीफ हा चित्रपट एक भावनिक आणि प्रेरणादायी प्रवास उलगडणार आहे

# मुंबईतील २४ वर्षीय तरुणीवर दुबईत सामूहिक अत्याचार, पाच नेपाळी तरुणांवर गंभीर आरोप

**मुंबई :** मुंबईची रहिवासी असलेल्या २४ वर्षीय तरुणीवर दुबईत तिच्या सहकाऱ्यांनी सामूहिक बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना २७ ऑक्टोबर २०२४ रोजी घडली होती. विशेष म्हणजे आरोपींमध्ये नेपाळी आणि इंडोनेशियन नागरिकांचा समावेश आहे. तरुणीवर सध्या मुंबईतील कांदिवली भागात एका रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.दुबईस्थित ५० वर्षीय एजंट माजिद याच्या मदतीने जुलै २०२३ मध्ये संबंधित तरुणी नोकरीनिमित्त दुबईला गेली होती. सुरुवातीला एजंटने तिला दोन महिलांसोबत राहण्यास लावले, जिथे ती घरकाम करत होती. नंतर, त्याने तिला अबू धाबीमधील शाखेतील मॅकडोनाल्ड्स आऊटलेटच्या किचनमध्ये नोकरी मिळवून दिली.पीडितेच्या आईने केलेल्या आरोपानुसार तिच्या पाच नेपाळी आणि इंडोनेशियन सहकाऱ्यांनी अबू धाबीमध्ये तिच्या खोलीत तिच्यावर बलात्कार केला. तसेच तिच्यावर क्रूरपणे शारीरिक अत्याचार केले. फ्री प्रेस जर्नल वेबसाईटने यासंदर्भात वृत्त दिले



आहे. तिला प्रथम अबू धाबीमधील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि नंतर त्याच शहरातील सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले१९ जून २०२५ रोजी मॅकडोनाल्डच्या अधिकाऱ्याने तिला मुंबईला पाठवले. ती सध्या कांदिवली पश्चिम भागातील शताब्दी रुग्णालयात दाखल आहे. तिच्यावर शारीरिक अत्याचार झाल्यामुळे तिला मानसिक धक्का बसला होता; ती कोणाशीही बोलण्याच्या मनस्थितीत नाही, असे तिच्या आईने सांगितले. पीडितेच्या आईने २६ जून २०२५ रोजी वर्सोवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. वर्सोवा पोलिसांनी तक्रार कांदिवली पोलिस ठाण्यात पाठवली; परंतु अद्याप एफआयआर नोंदवण्यात आलेला नाही.पीडितेची आई मध्यमवयीन घटस्फोटित महिला असून आपल्या तीन मुलींसह वर्सोवा येथे राहते. पीडिता ही तिची मोठी मुलगी आहे. पतीने त्यांना वाऱ्यावर सोडल्यानंतर आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने महिलेने मोठ्या लेकीला कामासाठी दुबईला पाठवले होते. दैनंदिन खर्च भागवण्यासाठी ती नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडून मिळणाऱ्या मदतीवर अवलंबून आहे. तिच्या इतर दोन मुली दहावी आणि बारावीत आहेत.

# मंत्री शिरसाटांच्या पत्राला माधुरी मिसाळांचे पत्रानेच प्रत्युत्तर...



**मुंबई :** गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घडामोडींमुळे महायुतीत अंतर्गत वाद असल्याचे समोर येत आहे. महायुतीतील अनेक मंत्र्यांना डच्चू देणार असल्याचे वृत्त आहे. यातच आणखी एक वाद समोर आला आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना खरमरीत पत्र लिहिले. यातून शिरसाटांनी माधुरी मिसाळ यांनी सामाजिक न्याय विभागाच्या परस्पर बैठका घेतल्याचा दावा केला आणि पत्रातून नाराजी व्यक्त केल्याचे वृत्त एबीपी माझाने दिले. यावर आता माधुरी मिसाळ यांनीही शिरसाटांच्या पत्राला पत्रानेच उत्तर दिले आहे. माधुरी मिसाळ म्हणाल्या, मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या निर्देशानुसार सामाजिक न्याय खात्याच्या बैठका घेतल्या आहेत. या खात्याची मंत्री असल्याने मला बैठकीसाठी कोणाच्या पूर्वपरवानगीची गरज नाही. कॅबिनेट मंत्र्यांच्या कुठल्याही कामात ढवळाढवळ केलेली नाही. लोकप्रतिनिधी म्हणूनच बैठक घेतली आहे. यावरुन आता महायुतीतील मतभेदांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा दोन मंत्री विभागीय कामकाजावरुन आमनेसामने आल्याचे चित्र आहे. संजय शिरसाट यांनी माधुरी मिसाळ यांनी परस्पर सामाजिक न्याय खात्याची बैठक घेतल्याचा दावा करत पत्रातून नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, यापुढे बैठका घ्यायच्या असतील तर माझ्या अध्यक्षतेखाली घ्या.सामाजिक न्याय विभागाची राज्यमंत्री म्हणून विभागाच्या आढावा बैठका घेण्याचा मला अधिकार आहे. सदर बैठका घेण्यासाठी आपली पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता वाटत नाही. सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजा संदर्भात मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडील विषयांचे वाटप करण्यात आले आहे. वाटप केलेल्या अनेक अधिकारांबद्दल मागील काही वर्षात विभागाने केलेल्या कार्यवाहीबद्दल विभागात माहिती सुद्धा उपलब्ध नाही, असे असताना याबाबत कोणतीही नाराजी व तक्रार व्यक्त न करता विभागाची राज्यमंत्री म्हणून मी कामकाज करत आहे. पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून विधिमत घेण्यात येत आहे.

# पुरंदर विमानतळासाठी काही शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास नकार, अजितदादांनी स्पष्टच सांगितलं, आता...



**पुणे :** विमानतळ करण्यासाठी अनेक जागा पाहिल्या. मात्र, विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सासवडजवळील जागा त्या दृष्टीने योग्य ठरली. पुण्याजवळ दुसरी जागा सध्या दिसत नाही. तेथील शेतकऱ्यांचा विरोध आहे. मात्र, त्यांना नाराज न करता विश्वासात घेऊन हा विमानतळ करण्याची सरकारची भूमिका आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन त्यांना इतर ठिकाणी शेतीवाडी करता येईल. त्यासाठी त्यांचे त्याच भागात पुनर्वसन केले जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. पुण्यात सर्किट हाउस येथे विविध विभागांच्या बैठका शुक्रवारी घेतल्यानंतर अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी पुरंदर विमानतळाच्या पॅकेजबाबत विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी या वेळी उपस्थित होते. पुरंदर विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत, त्यांना विश्वासात घेऊन तेथे विमानतळ करायचा, असे मंत्रिमंडळाने ठरविले आहे. सध्याचे पुण्याचा विमानतळ संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे पुण्याला दोन धावपट्ट्या असणारे, कॉर्गो, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड; तसेच कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, अहिल्यानगर या पाच-सहा जिल्ह्यांचा विचार करता विमानतळाची गरज आहे. अनेक ठिकाणच्या जागा पाहिल्या. सध्या तरी सासवडखेरीज पुण्याजवळ दुसरी जागा दिसत नाही. तेथील शेतकऱ्यांचा विरोध आहे. त्यांना नाराज करायचे नाही. त्यांना योग्य मोबदला देऊन त्यांना इतर ठिकाणी शेतीवाडी करता आली पाहिजे. त्यांची घरे पुन्हा उभी राहिली पाहिजे, अशी भूमिका अजित पवार यांनी स्पष्ट केली.सध्या जेवढे क्षेत्र घेत आहोत, त्यात एकही गाव जात नाही. पूर्वी संपादित करण्यात येणाऱ्या गावांपैकी काही क्षेत्र कमी केले आहे. पुरंदरमधील शेतकऱ्यांचे पुनर्वसन त्याच भागात केले जाणार आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) धोरणानुसार, जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी सूचना केल्या आहेत. पुरंदरमधील शेतकरी हे आमचेच लोक आहेत. कृपा करून गैरसमज करून घेऊ नका, गैर अर्थ काढू नका, असे आवाहन पवार यांनी केले. शहराच्या आणि परिसराच्या दृष्टिकोनातून तो जागा विमानतळाच्या योग्यतेची निघाल्याने तेथे विमानतळ करावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## कोकाटेंना डच्चू, धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिपद मिळणार? अजितदादाचं मोठं वक्तव्य...

**पुणे:** माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या काळात झालेल्या खरेदीत गैरव्यवहार झाला नसल्याचे चौकशीत आढळले आहे. त्यात मुंडे यांना क्लीन चिट देण्यात आली आहे. आणखी एका प्रकरणाची चौकशी सुरू असून, त्यात ते दोषी न आढळल्यास मुंडे यांना पुन्हा संधी देऊ,फ असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंडे यांच्या पुनर्वसनाचे संकेत दिले.कृषी खात्यातील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे मुंडे यांना मंत्रिपद गमवावे लागले. नुकतीच न्यायालयाने मुंडे यांना क्लीन चिट दिल्याचे समोर आले आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुंडे यांचे मंत्रिमंडळात पुनर्वसन करणार का, या प्रश्नाला उत्तर देताना, ङ्गमुंडे यांच्या संदर्भातील दुसऱ्या प्रकरणाच्या चौकशीतही ते दोषमुक्त ठरल्यास त्यांना पुन्हा संधी देऊ,फ असे अजित पवार म्हणाले.कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळात रमी खेळत असल्याची चित्रफित जाहीर झाल्याने त्यांच्यावर मंत्रिपद गमावण्याची टांगती तलवार आहे. त्यांचा राजीनामा घेणार का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, ङ्गसध्या मुख्यमंत्री दिल्लीत एका बैठकीला गेले आहेत. माझी आणि त्यांची सोमवारी भेट होईल. त्यानंतर मंगळवारी मी कोकाटे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेईन. मंत्रिमंडळात कोणाला ठेवायचे, कोणाला नाही हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे.फ कोणत्या मंत्र्यांना पद गमवावे लागणार आहे, असे विचारता, ङ्गमला माहिती नाहीफ, असे सांगून त्यांनी अधिक बोलणे टाळले.धनंजय मुंडे यांच्या कृषी खात्यातील घोटाळ्याबाबत आरोप करण्यात आले.

# तहसील कार्यालयासमोर उपोषण करणाऱ्या शेतकरी महिलेचा अंत....

## ...हा राजकीय खूनच, जितेंद्र आव्हाडांचे खडेबोल

**बीड :** महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून खंडणीखोरांच्या दहशतीमुळे बीड जिल्हा चांगलाच चर्चेत आला आहे. यामध्येच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आवादा कंपनी चर्चेच्या केंद्रस्थानी आली. यानंतर देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी त्यांच्या कुटुंबासह जनतेने अनेक आंदोलनं केली. जिल्ह्यातील खंडणीखोरीचा मुद्दा प्रकर्षाने समो आला आणि याविरोधात कारवाई करण्याची मागणी जोर धरु लागली. यातच आता बीडच्या केजमधून धक्कादायक बातमी समोर येत आहे. केज तहसील कार्यालयासमोर आवादा कंपनीविरोधात उपोषणाला बसलेल्या महिलेचा मृत्यू झाला आहे. यावर आमदार जितेंद्र आव्हाडांनी ट्विट करत सरकारवर निशाणा साधला आहे. जितेंद्र आव्हाडांनी याबद्दल ट्विट करत हा राजकीय खूनच असल्याचा दावा केला आहे. त्यांनी ट्विटसोबत एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये एक महिला आक्रोश करताना दिसत आहे. आव्हाड म्हणाले, केज तहसील कार्यालयासमोर आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात बेमुदत आंदोलन करणाऱ्या उपोषणकर्त्या महिलेचे निधन झाले. ही अत्यंत गंभीर आणि दु:खद घटना आहे. कंत्राटदार हर्षल पाटील नंतर हा देखील राजकीय खूनच आहे.जितेंद्र आव्हाडांनी असेही नमूद केले की, सदर महिलेच्या शेतातून अवादा कंपनीने विजेच्या वायर ओढून नेल्या होत्या. त्याविरोधात सदरील महिला उपोषण करत होती. मयत महिलेने स्थानिक प्रशासनाकडे दाद मागितली. पण आमच्या अखत्यारीत हे प्रकरण येत नाही, असं पत्र तहसीलदाराने सदरील महिलेस दिले, अशी प्राथमिक माहिती आहे. अखेर शेवटचा उपाय म्हणून ही महिला उपोषणाला बसली असताना तिचा जीव गेला. आत्महत्या करत आधी शेतकरी आपला जीव देतच होते. पण आता उपोषण करताना देखील त्याचे जीव जात आहेत. कृषिप्रधान देशाला काळिमा फासणारी ही घटना आहे.आवादा कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी हे उपोषण सुरु केले आहे. पण याचदरम्यान उपोषणकर्त्या



महिलेचा मृत्यू झाला. यानंतर आता शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. उपोषण सोडून आम्ही अंत्यविधीला जाणार नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यांनी महिलेचा मृतदेह तहसील कार्यालयासमोर उपोषणाच्या ठिकाणीच आणून ठेवला आणि कंपनीचा निषेध केला आहे. दरम्यान, जितेंद्र आव्हाडांनतर इतरांनीही या घटनेचे व्हिडिओ एक्सवर पोस्ट करत सरकारला जाब विचारला आहे. तसेच सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# समृद्धी महामार्गामुळे डोणगाव भाग २ येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**जनसंचलन/ डोणगाव**

नागपूर मुंबई समृद्धी महामार्ग लगत डोणगाव भाग २ येथील शेतकऱ्यांचे समृद्धी महामार्गाच्या पाण्याच्या अतिप्रवाहामुळे तसेच पूर्वी पासून असलेले जुने अनेक छोटे मोठे नाले यांचा प्रवाह मार्ग बदलून एकाच नाल्यामध्ये पाणी मिळवून दिल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी व त्यातील पिके खराळून गेली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सदरील समृद्धी लगत २७० चैनल नंबर जवळ असलेल्या नाल्याच्या कामाचे व्यवस्थानाबद्दल डोणगाव येथील शेतकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा ,तहसील कार्यालय मेहकर, मुख्य कार्यकारी अभियंता एमएसआरडीसी कार्यालय मेहकर, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव तसेच मेहकर विधानसभा आमदार सिद्धार्थ खरात यांना झालेल्या नुकसानीचे निवेदन दिले तसेच नुकसान भरपाई सह नाल्याच्या रुंदीकरण व खोलीकरण करून देण्याची मागणी केली गेली आहे २२ जुलै रात्री डोणगाव गोहगाव परिसरात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्या पावसाचे पाणी समृद्धी महामार्गावरून नाली द्वारे खाली येऊन समृद्धीला लावलेल्या कुंपणाच्या सिमेंट पाट्या तोडून हे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरले त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान तर झालेच सोबत शेतीचे सुद्धा खरडून गेली चैनल न२७०. पर्यंत दोन्ही बाजूंने नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली तरी प्रशासनाने त्वरित पंचनामे करावे अशी शेतकऱ्यांची मागणी होत आहे डोणगाव परिसरात गोहगाव रोड लोणी गवळी रोड अशा अनेक ठिकाणी रस्त्यावरून नालीद्वारे खाली येणाऱ्या पाण्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले त्याची पाहणी करून पंचनामे करावे समृद्धी प्रशासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी सोबतच पुन्हा असे पाणी शेतात शिरून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी उपाययोजना होणे गरजेचे आहे २२ जुलै रोजी झालेल्या पावसाने समृद्धी मार्गाला लावण्यात आलेल्या सिमेंटची कुंपण भी तुटली यावरून समृद्धी वरून खाली येणाऱ्या पाण्याचा दाब अति प्रमाणात असल्यामुळे समृद्धी प्रशासनाने पाण्याची कायमस्वरूपी उपाय योजना करणे गरजेचे आहे अशी तक्रार वसंतराव आखाडे तुळशीराम सोळंके दिलीप देवकर राजेश देवकर गजानन आखाडे तुषार आंबेकर आशिष आंबेकर प्रदीप आलेगावकर असे अनेक शेतकऱ्यांनीकेलीआहे

# तोरणा गुरुकुलमध्ये श्लोक पठन सोहळा उत्साहात साजरा.



**जनसंचलन/बुलडाणा**

तोरणा गुरूकूल सीबी एस सी शाळा उदयनगर येथे श्लोक पठन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष- :प्राचार्य- ऋषीकेश गडम सर, निलेश नखोद सर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून-:प्राध्यापक -विनोद वाघ सर, प्राध्यापक-राम गुंड सर, उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी यावेळी संस्कृत श्लोक सांगुन त्यांचे अर्थ यांचे स्पष्टीकरण दिले. विद्यार्थ्यांनी गीता, ज्ञानेश्वरी या ग्रंथातील श्लोकाचे प्रकटीकरण केले.यावेळी प्राध्यापक विनोद वाघ सर यांनी मुलांना भगवद गीतेची महती दिली,मराठी अस्मिता,संस्कृती जोपासने ही काळाची गरज आहे,तसेच विद्यार्थ्यांना त्यांनी शैक्षणिक अभ्यासाविषयी,बालसंस्कार, सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले.प्राध्यापक- राम गुंड सर यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरी मधील श्लोक सांगुन त्यांचे अर्थ यांचे प्रकटीकरण केले.भारतीय संस्कृतीमधील संस्कृत श्लोक यांबद्दल विद्यार्थ्यांना आवड निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांनमधील वकृत्व कौशल्य विकसित करणे. हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रशासन सज्ज; शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन-पालकमंत्री मकरंद पाटील यांची ग्वाही

**जनसंचलन/बुलढाणा**




जिल्ह्यातील सोयाबीन व मका पिकांवर हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असले तरी, या संकटावर मात करण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिली आहे. प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात ३१३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, कृषी विभाग व जिल्हा प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. बाधित क्षेत्रातील पंचनामे जलदगतीने सुरू असून, शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळवून दिली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी २४ जुलै रोजी प्रसारित केलेल्या तांत्रिक बुलेटिननुसार, अळीच्या जीवनचक्रावर आधारित एकात्मिक व्यवस्थापनाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे यांनी केले आहे. हुमणी अळी नियंत्रणासाठी उपाययोजना: हुमणी अळी ओळखणे: हुमणी अळी इंग्रजी अक्षराच्या आकाराची असून, पूर्ण वाढ झाल्यावर ती तीन ते पाच सेंटीमीटर रुंद आणि पांढुरक्या रंगाची असते. ही अळी सोयाबीन, कपाशी, तूर, ज्वारी, मूग, ऊस, सूर्यफूल, मिरची आणि वांगी यांसारख्या पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. यामुळे पिके कमकुवत होऊन जमिनीवर कोलमडतात. पिकांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी, बाधित झाडांची पाने पिवळी पडून सुकतात. सौम्य प्रादुर्भावासाठी जैविक नियंत्रण: जर शेतात हुमणी अळीचा सौम्य किंवा तुरळक प्रादुर्भाव आढळल्यास, मेटारायझियम () या जैविक कीटकनाशकाचा वापर करावा. ४० मिली मेटारायझियम १० लिटर पाण्यात मिसळून पिकांच्या मुळाजवळ टाकावे. तसेच, १ किलो मेटारायझियम भुकटी १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टर शेतात फेकावी. हे जैविक कीटकनाशक वापरताना शेतात पुरेशी ओल असल्याची खात्री करावी. तीव्र प्रादुर्भावासाठी रासायनिक नियंत्रण: हुमणी अळीचा तीव्र किंवा लक्षणीय प्रादुर्भाव आढळून आल्यास, स्थानिक तज्ञांच्या सल्ल्याने रासायनिक कीटकनाशकांचा सुरक्षित वापर करावा. ४०% + ४०% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचे ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात द्रावण तयार करून झाडाच्या खोडाजवळ टाकावे. ०.९% + २% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचा १२ ते १५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत ओलावा असताना झाडाच्या खोडाजवळ वापर करावा. शेतकऱ्यांनो, रसायनांचा वापर करताना लेबलवरील मार्गदर्शक सूचना व प्रमाणाचे काटेकोर पालन करावे. कोणतेही मिश्रण टाळून, तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत. 0शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत, अशी ग्वाही ना.मकरंद पाटील यांनी यावेळी दिली.

# बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांची सदिच्छा भेट व सत्कार



**जनसंचलन/ खामगांव**

सामान्य रुग्णालयात डॉक्टर मा. श्री. दत्तात्रय बिराजदार बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक यांची सदिच्छा भेट व सत्कार अ. भा. ग्रा.पत्रकार संघ संलग्नित आरोग्य समिती विदर्भ प्रमुख व एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक सुरजभैया यादव यांच्यासह अ. भा. ग्रा. प. संघ जिल्हाध्यक्ष राजु पाटील घाटे, गोविंदा फाटे, प्रदीप शमी, सिद्धेश्वर निर्मळ आदि लोकांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला व तसेच रुग्णाच्या आरोग्य विषयी चर्चा रुग्णाच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावू असे आश्वासन सुद्धा डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी दिले. यावेळी सामान्य रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. निलेश टापरे, निवासी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप सोनटक्के, डॉ. जयंत सोनोने, डॉ. गौरव गोयनका आदि उपस्थित होते अशी माहिती गोविंदा फाटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



# डोळ्यासमोर पंढरी, आणि पांडुरंगाला नाचते पाहण्याचे भाग्य मिळाले...

## चिखलीमध्ये विठू माऊलीच्या दारी कार्यक्रम उत्साहात व भर पावसात संपन्न..

जनसंचलन/चिखली

हिंदू माणसाला राम रमवतो, कृष्ण आकर्षित करतो आणि या दोघांचीही वैशिष्ट्ये असणारा पांडुरंग भक्तिरसातून जगाला मार्ग दाखवतो मंत्री आशिष शेलार आणि सांस्कृतिक खात्याचे सचिव विकास खर्गे साहेब यांनी आयोजित केलेल्या आमचे मोठे बंधू आदरणीय राजेश दादा सरकटे प्रस्तुत स्वर विहार च्या माध्यमातून माऊलीच्या दारी या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मी आपल्या सर्वांचं मनापासून अभिनंदन करते..! मनापासून आपण सगळेजण आलात आपले आभार सुद्धा मानते.. अशा शब्दात चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार यांनी आपले उद्घाटनीय विचार व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक विभाग व सांस्कृतिक संचालनालय मुंबई यांच्या विद्यमाने भक्तीरसाचा अमृतमय अनुभव अशा भक्तीसंगीताचा कार्यक्रम चिखली मध्ये परमहंस मौनीबाबा रामकृष्ण मठाच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण प्रा. राजेश सरकटे, सुप्रसिद्ध गायिका अमृता नातू, गायिका पायल सरकटे तसेच या संचाकडून करण्यात येणारे दिंडी नृत्य व समाविष्ट कथक नृत्याचा अविष्कार हे होते. या कार्यक्रमाच्या दिपप्रज्वलन प्रसंगी बोलताना आमदार म्हणाल्या की, आपण इतके दिवस फक्त ऐकून होतो, परंतु यावर्षी या पांडुरंगाच्या वारीमध्ये जाण्याचे भाग्य त्यांना मिळालं आणि तिथे गेल्यानंतर खरी वारी काय असते ते कळालं अशा शब्दात आ. यांनी वारीची महती सांगितली. सगळं काही विसरून श्रीमंत,गरीब जाती-पाती, लिंग सगळा भेदभाव विसरून त्या ठिकाणी प्रत्येक वारकरी हा पांडुरंगाच्या सेवेमध्ये तल्लीन झालेला असतो आणि कुठेतरी या जगाचा सुख किंवा मोक्ष कुठे असेल तर ते पांडुरंगाच्या चरणी आहे ही भावना त्याला त्या ठिकाणी वारीमध्ये गेल्यानंतर येते.असे वारीची अनुभूती आ. यांनी व्यक्त केली. ज्ञानेश्वर माऊलीची ही ७२५ वी जयंती आहे आणि सोबतच श्री संत तुकाराम महाराजांची ही ४२५ वी जयंती आहे आणि अशा या शुभमुहूर्तावरती देवा भाऊंनी आयोजित केलेला हा वारकऱ्यांसाठीचा हा कार्यक्रम आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये तर प्रत्येकाची इच्छा असते की आपण सुद्धा पांडुरंगाची सेवा करावी, आपण सुद्धा वारीमध्ये जावं, पांडुरंगाचे दर्शन घ्यावं परंतु संसारिक माणसाला ते शक्य होत नाही परंतु आज राजेश सरकटे यांच्या माध्यमातून आपल्याला अनुभवता आलं की पंढरीची वारी कशी असते आणि त्या वारीचा अनुभव, साक्षात्कार आपण वारीमध्ये आहोत की काय? त्याचा साक्षात्कार आपल्याला या ठिकाणी झालेला आहे. असे गायक कलावंत यांच्या स्तुतीपर आमदार म्हणाल्या. गायक राजेश सरकटे, गायिका अमृता नातू त्याचप्रमाणे राजेश सरकटे यांची कन्या गायिका पायल सरकटे यांनी गायनातून अक्षरक्ष पंढरी डोळ्यासमोर उभी केली आणि पांडुरंगाला नाचते केले. अशा शब्दात गायक व संचांचे आमदार यांनी कौतुक केले. कलावंतांना असं पाठबळ हव असत, कापसाची भूमी म्हणून विदर्भ ओळखला जात होता या कापसाच्या वाती आणि सरकीतलं तेल आणि त्या सगळ्यांचे परंपरा जपणारी सगळी मंडळी येथे आहोत आणि म्हणून आपण सगळे दुष्काळी शेतीच्या बापाचे वंश आहोत, दिस जातील दिस येतील या भावनेने आपण आयुष्य जगत असतो पण मला असं वाटतं की या ठिकाणी आमदार महोदय जेव्हा स्वतः वारीमध्ये जातात त्यामध्ये एसटी बस मध्ये बसून नागपूरच्या अधिवेशनाला जाणारे सांगोल्याचे आमदार गणपतराव काका आणि वारीमध्ये सामील होणाऱ्या चिखलीच्या आमदार श्वेता ताई महाले यांचे वेगळं पण आपण निश्चितच लक्षात घेण्यासारखे आहे, वाखाण्यासारखे आहे.असे गायक राजेश सरकटे यांनी मनोगत व्यक्त केले.



बहिणाबाई चौधरी एका ठिकाणी म्हणतात की माहेर म्हणता म्हणता ओठ ओठाला ग मिळे, सासर म्हणता म्हणता वार तोंडामध्ये खेळे!! म्हणून विठू माऊलीच्या पंढरीला जाणं म्हणजे माहेरी जाण्यासारखा आहे, चंद्रभागा ही साक्षात माझी बहीण आहे हे गृहीत धरून जेव्हा आपण वारीत सामील होतो तेव्हा निश्चितच जीवनाचे आध्यात्मिक सूत्र आपल्याला सापडायला लागते अशा शब्दात प्रा. विनोद सरकटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमांमध्ये विठ्ठल, विठ्ठलाची भक्ती, पंढरपूर आणि एकूणच भक्ती संप्रदायाचा भक्तीरस श्रवन करून श्रोत्यांचे कर्ण तृप्त झाले. याप्रसंगी आमदार यांच्यासह प्रा. सदानंद देशमुख, कर्नल जतकर,अंकुशराव पाटील, सुहास शेटे, पंडित दादा देशमुख, सागर पुरोहित, संजय गाडेकर,सुधीर चेके,राजेंद्र काळे, सुरेंद्र पांडे, संजय अमृतवार, ठाणेदार संग्राम पाटील, मुख्याधिकारी प्रशांत बिडगर, गटविकास अधिकारी समाधान वाघ,श्री गजानन पोफळे, अशोक अग्रवाल, शरद भाला, विजय वाळेकर इत्यादी जण उपस्थित होते

# या कुटुंबांना धोका? वृत्तवाहीनीतून विना पुरावा बातमी!

## राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप!
## न्याय हक्क जन आंदोलन समितीवर कारवाई करण्याची मागणी!

जनसंचलन/बुलडाणा

जळगाव जामोद येथील आम. संजय कुटे यांचे निकटवर्तीय समजल्या जाणारे भाजप कार्यकर्ते स्व.पंकज देशमुख यांची आत्महत्या की घातपात हे प्रकरण राज्यभर गाजत आहे. न्यायासाठी त्यांच्या पत्नी शासन दरबारी उंबरठा झिजवत आहेत. त्यांना जळगाव जामोद संग्रामपूरच्या न्याय हक्क जन आंदोलन समितीने पाठिंबा दर्शवित संघर्ष जारी ठेवला असून, ही समीती अश्लील पोस्ट व्हायरल करत असून काही कुटुंबांना पुरावे नसताना जीवघेण्या धमक्या देत असल्याची तक्रार जिल्हा पोलीस अधीक्षक यांना करण्यात आली आहे.तक्रारीत एका वृत्तवाहिनीचा प्रामुख्याने उल्लेख असून, योग्य चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. गीता सरोदे, शिल्पा ठाकरे, सुमिती शर्मा, भावना देशमुख, नंदा देशमुख, तीरोत्तमा शेळके, नाहीद परविन अब्दुल जलील, द्वारकाबाई धर्मे,परविन जहाँ जकीउल्लाँ खान, पुनम लपटने यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना या संदर्भात निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, जळगाव जामोद येथील स्व.पंकज देशमुख यांनी शेतात बायपास घेऊन आत्महत्या केली होती.परंतु त्यांच्या कुटुंबीयांना पतीची आत्महत्या नसून हत्या केली आहे अशी भावना निर्माण झाल्यामुळे त्यांनी सीआयडी चौकशीची मागणी शासनाकडे केली आहे.याप्रकरणी सोशल मीडिया व वृत्तपत्र माध्यमातून सदर प्रकरणाचा पोलीस तपास सुरू असल्याचे कळत आहे.२२ जुलै रोजी एका वृत्तवाहिनीच्या बातमीतून या प्रकरणी कोणताही पुरावा नसताना स्वर्गीय पंकज देशमुख यांच्या कुटुंबीयांनी आमच्या पतींचे नाव घेतली,त्यामुळे कुटुंबीयांची प्रचंड बदनामी होत असून होणाऱ्या मानसिक त्रासापायी आम्ही ताण-तणावात आहोत.सोशल मीडियाच्या माध्यमातून आमच्या पतींना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत व अश्लील भाषेत टीकाटीपणी केलेली आहे.याप्रकरणी जळगाव जामोद येथील विविध राजकीय पक्षाचे नेते- कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन न्याय हक्क जन आंदोलन समिती स्थापन केली आहे. सदर समितीस्थापन झाल्यापासून आणि वर्तन पाहता ही समिती राजकीय हेतूने प्रेरित असून तक्रारदार श्रीमती देशमुख यांच्या सतत संपर्कात राहून त्यांची दिशाभूल करीत आहे,असे आमचे ठाम मत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या समितीतील काही सदस्यांनी व त्यांच्या समर्थकांनी आमच्या पतींना सोशल मीडियावर जीवे मारण्याची धमकी दिली आहे.षडयंत्ररचून या प्रकरणी आम्हाला अडकवण्याचा प्रयत्न सुरू असून, संबंधित समिती सदस्यांची चौकशी करून योग्य कारवाई करण्यात यावी,आमच्या पतींवर अतिरिक्त



गुन्हेदाखल करण्याची शक्यता असल्याचेही निवेदनातम्हटलेआहे. स्व.पंकज देशमुख हत्या की आत्महत्या प्रकरणाची सीआयडी चौकशी करून जे कोणी गुन्हेगार असतील त्यावर त्वरित कारवाई करावी अशी मागणी जिल्हाभरातून होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८